संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सगळेच अविश्वासाचे वातावरण

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होऊन महिना पूर्ण झाला. शपथविधी समारंभ होऊनही तीन आठवडे होत आहेत तरीदेखील राज्यात सरकार कामाला लागले आहे, असे चित्र अद्याप दिसत नाही. सरकार नवे असल्याने त्यांना सगळ्या गोष्टी समजून द्यायला वेळ लागेल ही गोष्ट खरी; परंतु नव्या सरकारची सूत्रे स्वीकारलेला, अनेकांना मंत्रालय, तिथले सनदी अधिकारी, त्यांच्या कामाच्या पध्दती किंवा एकूण राज्यकारभाराची शैली अगदीच माहीत नाही असे नसून सरकारचे अस्तित्व माहीत नाही असे नाही, असे असून सरकारचे अस्तित्व अजून जाणवत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे विश्वासमत मंजूर करूनही एकूण सरकार आणि भाजपात अविश्वासाचे वातावरण आहे. सध्या भाजपात कोणाचा शब्द शेवटचा याविषयीच मोठे प्रश्नचिन्ह आहे. आतापर्यंत प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी यांचा निर्णय अंतिम मानला जात होता. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांचा शब्द तरी शेवटचा किंवा अंतिम मानला जायला हवा होता. ते प्रदेशध्यक्ष होते तोपर्यंत काही प्रमाणात त्यांच्या शब्दाला किंमत होती; परंतु इथे तीदेखील परिस्थिती राहिलेली दिसत नाही. सध्या तर त्यांच्या मंत्रिमंडळात जे काही इन मीन तीन म्हणजे जे काही थोडे मंत्री आहेत ते सगळेच आपणच मुख्यमंत्री असल्यासारखे वावरत आहेत. प्रसिध्दीच्या बाबतीत या सर्व मंत्र्यांनी फडणवीसांना केव्हाच मागे टाकले आहे. एवढेच नव्हे तर अनेक राजकीय निर्णय घडामोडी मुख्यमंत्र्यांपेक्षा या मंत्र्यांना सर्वांत आधी कळताना ज्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी भाष्य करणे अपेक्षित असते, त्याबाबत हे मंत्री स्वतःच माहिती देऊन मोकळे होतात. कोणते भाष्य, निर्णय केव्हा करावेत, केव्हा करू नयेत, किती बोलावे, केव्हा आणि कसे बोलावे याबाबत मंत्र्यांनी कोणत्याच मर्यादा पाळायच्या नाहीत असे ठरवलेले दिसते. एखादा वयाने लहान असलेला मुलगा बऱ्याच दिवसांनी नवे कपडे घालून गल्लीभर धावत सुटतो. मित्रांना ते दाखवत राहतो तशी अवस्था या मंत्र्यांची झाली आहे.

### अनावश्यक शेरेबाजी

गेल्या महिनाभरात याची बरीच उदाहरणे पहायला मिळाली. मंत्रीपद मिळाल्यानंतर आपल्यावर एक विशेष जबाबदारी आहे आणि राजकीय शेरेबाजीपेक्षा आपल्याकडे आलेल्या खात्यात अधिकाधिक लक्ष घालून काही वैशिष्ट्यपूर्ण मत मांडावे, काही आगळी-वेगळी निरिक्षणे नोंदवावीत, त्यातून सुचणाऱ्या एखाद्या चांगल्या कल्पनेचे केवळ सूतोवाच करावे किंवा ज्याबाबत सातत्याने तक्रारी होत आहेत. सामान्य जनतेला ज्याचा त्रास सहन करावा लागत आहे. नवे सरकार आल्यावर त्या गोष्टी बंद होतील किंवा नवे सरकार त्याचा पायबंद करील अशी लोकांची अपेक्षा आहे, ते निर्णय घेण्याचे धाडस या नव्या मंत्र्यांनी दाखवायला हवे. त्याऐवजी सर्वच मंत्री राजकीय आणि वादग्रस्त शेरेबाजी करण्यात आघाडीवर आहेत. जणू काही त्यांच्यात स्पर्धा लागली आहे. ज्येष्ठ मंत्री असलेले एकनाथ खडसे यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी शेतकरी मोबाईलचे बिल भरतो पण वीज बिल भरत नाही असे भन्नाट विधान केले. हाडाचे शेतकरी असणाऱ्या खडसे यांनी शेतकऱ्यांशी असे हाडवैर करणारी भाषा का वापरावी, हे एक कोडेच आहे. दुसरे मंत्री सुधीर मुनगंटीवार हे स्वतंत्र विदर्भाचा विषय सोडायला तयार नाहीत. सध्या सर्वच खात्यांमध्ये त्यांचा मुक्त संचार असतो. चंद्रकांत पाटील हे तसे राजकारणातच नवखे, परंतु पश्चिम महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व, विद्यार्थी परिषदेचा सच्चा कार्यकर्ता, म्हणून त्यांना थेट मंत्रीपद मिळाले. परवा त्यांनी शिवसेना भाजप यांच्यातील समझोत्याचा मुहूर्त जाहिर करून त्यांच्यावर चर्चेची जबाबदारीही सोपवली गेली. त्यांच्या या काहीशा आगंतूक नेतृत्वामुळे इतर अनेक ज्येष्ठ नेतेच राजकारणात कसे नवखे आहेत,असे चित्र पाटील यांनी निर्माण केले आहे. अशी सगळी ही मोठी कसरत आणि सर्कस या नव्या मंत्रिमंडळाची सुरू आहे.

### फडणवीसांना आवाज वाढवावा लागेल

असे का होते तर फडणवीस सरकारने सभागृहात विश्वासमत प्राप्त केले असले तरी अद्याप बहुमत प्राप्त केलेले नाही. शिवसेनेला किंवा राष्ट्रवादीला बरोबर घेतल्याशिवाय फडणवीस सरकार स्थिरस्थावर होणार नाही. अजून दोन डझन नवे मंत्री घेतले जातील. त्यात काही खात्यांची फेरफार होईल. नव्याने येणारा मंत्री कोण असू शकेल याचा अंदाज सध्याच्या खेळाडूंना आला आहे आणि मग कोणाशी कसे जमवून घ्यायचे, आपले पत्ते कोणाच्या हातात जाणार नाहीत ना, आपली या सगळ्यातली ज्येष्ठता अबाधित राहील की नाही, अशा अनेक मुद्यांबाबत सगळे मंत्रिमंडळच साशंक आहे. मग अजून काही काळ जाऊ द्यावा. निर्णयांची घाई करू नये. थोडी वाट पाहून नव्या विस्तारित मंत्रिमंडळाची रचना आणि अल्पमतातून बहुमतात गेल्यावर खऱ्या कामकाजाला प्रारंभ केलेला बरा, असा पवित्रा या मंत्रिमंडळाने घेतलेला दिसतो. दुसरी बाब म्हणजे विश्वासमत आवाजी मतदानाने मंजूर झाले आहे. कदाचित म्हणूनच कामकाजाऐवजी मंत्र्यांकडून इतर आवाजच जास्त ऐकू येत असावा. अर्थात ही सध्याची परिस्थिती जरी असली तरी फडणवीसांना आपला आवाज वाढवावा लागेल, तरच सरकार कामाला लागले आहे असे दिसू शकेल.अर्थात या सगळ्या घडामोडी हिवाळी अधिवेशनापूर्वी पूर्ण कराव्या लागतील. अन्यथा, आधीच अडचणीत असलेल्या या सरकारला सेना आणि राष्ट्रवादी कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करू शकतील. या सगळ्यातून सहीसलामत बाहेर पडायचे असेल तर कायमस्वरूपी उपाययोजना करणेच श्रेयस्कर ठरेल.